# बंधमुक्ता

"सुस्मिता, भलताच हट्ट धरू  नकोस. अजून तू लहान आहेस. आर्यिकेचं खडतर व्रत तुला निभवणार नाही. एकदा व्रत घेतलं की, परत गृहास्थाश्रमात येण्याची वाट बंद होते, माहीत आहे ना तुला ?"

"सुस्मिते, तुला आम्ही तळहातावरच्या फोडाप्रमाणे जपलं आहे. कोणताही त्रास होऊ नये म्हणून पराकाष्ठेने प्रयत्न केले आहेत. अगं, कारशिवाय कॉलेजात न जाणारी तू, अनवाणी पायांनी, उन्हातान्हातून दगडधोंड्यांनी खडबडीत झालेल्या रस्त्यावरू न कशी चालणार ?" तिचे बाबा म्हणाले.

"आई, बाबा, माझा स्वभाव तुम्हाला माहीत आहे. मी पूर्ण विचार केल्याशिवाय कोणताही निर्णय घेत नाही. लहान असताना पू. अजितमती माताजींना पाहिलं, तेव्हापासून माझ्या मनात ही उच्छा निर्माण झाली. पण ग्रॅज्युएशन होईपर्यंत मी थांबले होते. आता माझं एम.ए. पूर्ण झालं आहे, म्हणुन मी माझा विच्र तुम्हाला सांगितला,"सुस्मिता निग्रहाने म्हणाली.

सुस्मिता ही अमरावतीचे नगरशेठ गोवर्धनदास यांचं शेंडेफळ. त्यांना आणखी दोन मुले होती. ती शिक्षण पूर्ण करुन शेठजींना व्यवसायात मदत करत होती. सुस्मिता एम.ए. झाली. आपल्या तोलामोलाचे स्थळ पाहून तिचा विवाह सरुन देण्याचे त्यांनी ठरवले होते. त्याप्रमाणे त्यांनी वरसंशोधनही सुरु केले होते. पं सुस्मिताची त-हाच और. तिचं वेगळेपण लहानपणापासूनच नजरेत भरत होतं. गोवर्धन शेठजींचे घराणे खानदानी श्रीमंतीचे, जैन समाजातच नव्हे तर सा-या विदर्भात त्यांचे नांव प्रत्येकाच्या तोंडी होते. कारण शेठजींचे कर्तृत्वच तसे अलौकिक होते. त्यांच्याकडून कोणीही याचक विन्मुख जात नसे. त्यांनी अनेक शिक्षणसंस्थांना मदत केली होती. त्यानी अमरावतीच्या पार्श्वनाथ मंदिराचा जीर्णोद्धार केला होता. अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत केली होती. तरू ण लोकांना व्यवसाय उभारण्यास मदत केली होती. पण कोणत्याही गोष्टीचा गाजावाजा केला नव्हता. नावासाठी, मोठेपणासाठी त्यांनी काही केलं नव्हतं. पत्नीही त्यांना शोभेशीच होती. पतीच्या प्रत्येक कार्यात तिचा सहभाग होता. तीही अतिशय धार्मिक वृत्तीची होती. रोज अभिषेक, पूजा, स्वाध्याय केल्याशिवाय ती तोंडात पाणी घेत नसे. शहरात त्यागी लोक आले की त्यांच्या आहाराची व्यवस्था तीच बघर असे. पर्यूषण पर्वाचे दहा दिवस तर विचारू च नका. घराला जत्रेचं स्वरुप येई. आईचं पाहून छोटी सुस्मिताही

सगळ्यात उत्साहाने भाग घेई. दर्शनपाठ, भक्तामर स्तोत्र,मेरी भावना ती लहानपणापासून आईबरोबर म्हणत असे. त्यामुळे तिचे पाठांतर चांगले झाले होते. वयाच्या चौथ्या पाचव्या वर्षापासून ती ध्यान करीत असे.

शाळा, कॉलेजातही ती सर्वांची लाडकी होती. देखणी, बुद्धीमान सुस्मिता नवाप्रमाणेच हसतमुख होती. वक्तृत्व, निबंध, कथाकथन, खेळ या सर्व गोष्टीत ती निपुण होती. पण या सर्व गोष्टीत भग घेऊन ती अलिप्त असे. कोणत्याही गोष्टीचा मोह तिला नव्हता. पू. अजितमती माताजींना पाहिल्यापासून आपणही आर्यिका व्हावे, गावोगावी विहार करू न आपल्या प्रवचनातून लोकांत जागृती निर्माण करावी असे तिला वाटत होते. ती जसजशी मोठी होऊ लागली, तसतशी तिची विरक्त भावनावाढतच गेली आणि आज तर तिने मातापित्यासमोर आपला निर्धार जाहीर केला. ती शेठजींना म्हणाली-

"बाबा, मी पू. पार्श्वमती अम्मांच्या आश्रमात राहून अध्ययन करणार आहे. तुम्ही मला त्यांच्याकडे पोचवून द्या."

गोवर्धन शेठजींना मुलीचा हट्टी स्व्भाव माहीत होता. त्यानी तिला कारंजाच्या आश्रमात पू. पार्श्वमती अम्मांच्या जवळ पोचवून दिले. तेथे अनेक ब्रम्हचारिणी धर्माचे अध्ययन करण्यासाठी राहात होत्या. तेथे तिने द्रव्यसंग्रह, छहढाला, गोम्मटसार, रत्नकरंड श्रावकाचार आणि षट्खंडागम यांचे अध्ययन केले. थोड्याच दिवसात सर्व ग्रंथ आत्मसात केले. आपल्या धर्मग्रंथात किती अमोल ज्ञानरुपी रत्नभांडार भरले आहे, याची तिला जाणीव झाली. हे ज्ञान लोकांपर्यंत पोहोचले पाहिजे असे तिला वाटू लागले. आपण आर्यिका दीक्षा घेतली तरच लोक आपले म्हणणे श्रद्धेने ऐकून घेतील असे तिला वाटू लागले. तिने आपला विचार पू. माताजींना सांगितला-

"माताजी, माझे अध्ययन पूर्ण झाले. मल?अ आता आर्यिका दीक्षा घेण्याची अनुज्ञा द्यावी. आपणासारखेच ज्ञान-ध्यान-साधनेत जीवन घालवावे असे मला वाटते."

"सुस्मिता, ज्ञान मिळविण्यासाठी दीक्षाच कशाला घ्यायला हवी ? तू बुद्धिमान आहेस. डबल ग्रॅज्युएट आहेस. प्रोफेसर हो. ज्ञान मिळव. ज्ञानदानातील आनंदाचा उपभोग घे. या खडतर जीवनात कशाला येतेस ? तुझ्या स्वाभिमानी, तेजस्वी स्वभावाला हे जीवन मानवणार नाही," माताजींनी तिची समजूत घालण्याचा प्रयत्न केला.

"माताजी, मला ज्ञानातून समाजाची जागृती करायची आहे. आपल्या जैन समाजात त्यागींना मान आहे. त्यांच्यावर लोकांची श्रद्धा आहे. त्या श्रद्धेतून मला त्यांचे मत परिवर्तन करायचे आहे. त्यांच्यात जागृती निर्माण करायची आहे," सुस्मिता म्हणाली.

माताजींनी तिच्यापुढे हर मानली. त्यांनी तिला प.पू. अभिन्णदनसागर महाराज अतिशय शांत प्रवृत्तीचे होते. मोठे वक्ते नसले तरी त्यांच्याजवळ ज्ञानाचा साठा भरपूर होता. सुस्मिताला पाहताच, हे पाणी वेगळेच आहे, याची जाणीव त्यांना झाली. तिच्या कांतिमान गौरवर्ण, ओजस्वी वाणी, आपला मुद्दा पटवून देणयआची हातोटी पाहून हाहीरा आपल्या संघाचे तेज वाढवील, ही आशा त्यांच्या मनात प्रज्वलित झाली. तरी त्यांनी तिला पू. पार्श्वमती अम्माप्रमाणेच परावृत्त करण्याचा प्रयत्न केला.

"सुस्मिता, तुम्ही पूर्ण विचार करा. तुमचा स्व्भव स्वाभिमानी आहे. संघात अनेक प्रकारचे लोक अस्तात. त्यांच्याशी जमवून घेणे अवघड असते. तुम्ही आतापरयंत कौतुकाच्या नजरा झ ेलतच वाढलात. येथील वातावरण वेगळे आहे. त्याच्याशी तुम्ही समरस होऊ शकाल का ? अनवाणी विहार करावा लागेल. ऊन, पाऊस, थंडी, वारा सहन होईल का तुमच्या नाजूक प्रकृतीला ?"

"महाराज, मी नाजूक असले, तरी मनाने कणखर आहे. हे सर्व सहन करण्याची माझ्या मनाची पूर्ण तयारी आहे,"सुस्मिता म्हणाली.

दीक्षेचा दिवस ठरला. सुस्मिताचे कुटुंबीय आले. समार्भपूर्वक केशलोच झाला. सुस्मिता आपल्या हातांनी स्वतःचे काळेभोर , लांब सडक केस हसतमुखाने उपटू लागली, तिव्हा आईवडिलांना तिच्याकडे पाहवेना. त्यांच्या मुखावर वेदना उमटली. अश्रूंनी त्यांच्या दृष्टीसमोर पडदा उभा करुन ते दृश्य झाकून टाकले. केशलोच झाल्यावर प.पू.महाराजांनी तिला पिंछी-कमंडलु अर्पण केले. नाव मात्र तेच ठेवले-सुस्मिता माताजी !

सुस्मिता माताजी आता संघातील एक घटक बनल्या. इतर आर्यिकांच्या बरोबर त्यांचा आहार, विहार, अध्ययन सुरु झाले. त्यांची ओज्स्वी वाणी, धीरगंभीर आवाज, विषय समजावण्याची हातोटी पाहून प.पू. महाराज त्यांनाच प्रवचन द्यायला सांगत. त्यांची प्रवचने ऐकून लोक प्रभावित होत. व्यवहारातील सोपी उदाहरणे हेऊन विषय सोपा करुन सांगण्याची कला तिच्यात उपजतच होती. महाराजांना त्यांचा अभिमान वाटे, लोक कौतुक करीत.

सुस्मिताजींना त्यात काही मोठेपणा वाटत नसे. पण संघातल्या बाकी आर्यिकांना वाईट वाटे. त्यांना हेवा वाटे. ही कनामागून आली आणि तिखट झाली असा भव त्याण्च्या चेह-यावर स्पष्ट दिसे. त्या आपापसात तिची निंदा करीत. महाराजांशी तिचे वागणे त्यांना लघळपणाचे वाटे. त्यांच्या बोलण्याचे विषय वेगळेच असत. त्या तिचा द्वेष करीत.

सुस्मिताजींना वाटे, आपला मार्ग चुकला तर नाही ना ! संसार-त्याग करू न आलेल्या या सर्व माताजी सांसारिक गोष्टींचाच विचार करतात. यांचे कषाय, हेवेदावे, मानापमान जर कायम असतील तर त्यांनी कशाचा त्याग केला ? ब्रम्हचारी, नवीनच मुनी झालेल्यांचीही त-हा औरच. प.पू. महाराज सुस्मिता माताजींचे प्रस्थ विनाकारण वाढवीत आहेत असे त्यांना वाटे. ते सुस्मिताजींच्या चांगल्या गोष्टीकडे कौतुकाने पाहण्याऐवजी उपेक्षेने पहात. याचे ही सुस्मिताजींना वाईट वाटे. एकदा त्या एका साधारणशा खेडेगावी महाराजांबरोबर विहाराला गेल्या होत्या. चातुर्मास त्याच गावात होणार होता. प. पू. महाराजांच्या आहार नेहमी पाटील, सावकार, प्रतिष्ठीत लोक यांच्याच घरी होई. त्याच बरोबर इतर त्यागी जणांचाही. आहारासाठी शुद्ध तूप, दूध, फळांचे रस, उत्तम धान्यांचा स्वयंपाक असे. हे पाहून एकेदिवशी सुस्मिताजी प.पू. महाराजांना म्हणाल्या-

"महाराज, आपण नेहमी गावातल्या धनिक मंडळींकडेच आहार घेतो. चारी ठाव स्वयंपाक करुन ते आपल्याला श्रद्धेने आहार देतात हे खरे. पण आपल्या समाजात गरीब लोकही आहेत. त्यांच्याकडे आपण आहाराला का जाऊ नये ?"

"आहार विधीला खर्च फार येतो, म्हणून गरीब लोक त्या भानगडीत पडत नाहीत,"प.पू. महाराज म्हणाले.

"मग आपण भाजी भाकरी, ताक-कण्या असा आहार घेतला तर आपले काय बिघडते ?" सुस्मिताजी म्हणाल्या.

"सुस्मिताजी, आपण त्यांना अमुकच पदार्थ तयार करा असे तर काही सांगत नाही. श्रद्धेने, भक्तीने श्रावक बोलावतात. ते देतील तेच अन्न आपण ग्रहण करतो. यात आपला काय दोष ?" प.पू. महाराजांनी आपली बाजू स्पष्ट केली.

पण सुस्मिताजींना हे पटले नाही. त्यांनी गरीब जैन घरातूनच आहार घेण्याचा निर्णय केला. मंदिरातील पुजा-याच्या बायको बरोबर निरोप पाठवून आपण आहाराला त्या भागात येत

असल्याचे कळविले. दुस-या दिवशी त्या एकट्याच एका गरीब शेतक-याच्या घरी आहाराला गेल्या. त्या घरातील स्वच्छता, टाप-टीप पाहून त्यांना समाधान वाटले. आहार देताना, त्या पतिपत्नीच्या मुखावर जो तृप्तीचा, प्रसन्नतेचा, कृतकृत्यतेचा भाव होता, तो पाहून आपला निर्णय बरोबर आहे याचे त्यांना समाधान वाटले. भाजी-भाकरीचा तो आहार त्यांना तृप्त करू न गेला. आणि त्या रोज गरीब वस्तीतच आहाराला जाऊ लागल्या. प्रवचन देताना स्त्रियांना त्या त्यांच्या हक्काची जाणीव करुन देऊ लागल्या. समाजातील अहिंसेचे वृथा स्तोम, अज्ञान, विषमता यांचे चित्र त्यांच्या त्या समोर उभे करु लागल्या. अन्याय करणेच नव्हे तर अन्याय निमूटपणे सहन करणे हाही गुन्हाच आहे, हे त्या प्रतिपादन करु लागल्या. स्त्रियांना, गरीबांना त्यांचे म्हणने पटू लागले. पण गावातील प्रस्थापितांना त्यांचे हे वागणे पटेना. गरीबांचे शोषण केल्याशिवाय, त्यांच्यावर अन्याय केल्याशिवाय त्यांचे उद्योग धंदे चालणार नव्हते. त्यांनी प.पू. अभिनंदनसागर महाराजांकडे सुस्मिताजींची तक्रार केली.

"महाराज, आपल्या संघातील सुस्मिता माताजी गरीब वस्तीत मिसळतात, ते आपल्याला पटते का ?" पाटलांनी महाराजांना विचारले.

"महाराज, माताजी त्या लोकांना आमच्या विरुद्ध भडकवतात. अशाने आम्हाला मजूर मिळणार नाहीत. आमचे कर्जे बुडतील," सावकाराने तक्रार केली.

"महाराज, आपण माताजींना समजावून सांगा," व्यापारी म्हणाले.

महाराजांनी त्यांना समजावून पाठवून दिले. पण त्यांच्याही मनात खळबळ माजली. सुस्मिताजी आल्यापासून त्यांच्या संघातील वातावरण बदलले होते, त्याची महाराजांना जाणीव झाली होती. सुस्मिताजीसंबंधी त्यांच्याकडे अनेक तक्रारी आल्या होत्या. गावातील लोकही त्यांच्यासंबंधी तक्रार करीत होते. गरीब जैन समाज मात्र त्यांचे गुणगाण करीत होता. त्यांनी सुस्मिता माताजींना बोलावून घेतले.

"सुस्मिताजी, कसे काय चालले आहे तुमचे अध्ययन, स्वाध्याय ?"

"ठीक चाललं आहे महाराज, सध्या आम्ही समयसाराचा स्वाध्याय करीत आहोत. किती महान आहेत नाही आचार्य कुंदकुंद !" सुस्मितजी म्हणाल्या.

"खरे आहे, आचार्यांची थोरवी अवर्णनीय आहे. सध्या तुमचा काय कार्यक्रम चालू आहे ? दुपारी काय करता ?" महाराजांनी विचारले.

"दुपारी सामायिक संपलं की, मी गरीब वस्तीत प्रवचन देते. नवीन जगात काय चाललं आहे, याची स्त्रियांना माहीती देते. अजून येथील स्त्री-पुरुष जगाच्या किती पाठीमागे आहेत ! त्यांना आपल्या पुरुषार्थाची, हक्काची जाणीवच नाही. स्त्रियांना इत्कए कष्ट करू नही पुरुषांचे अत्याचार सहन करावे लागतात. त्यांना काही किंमतच नाही आणि या पुरुषांचं काही चुकतं असं स्त्रियांना वाटत नाही. मला तर या सर्व प्रकाराची चीढ येते. स्त्रियांना जीव नाही ? आत्मा नाही ? ज्या भगवान महावीरांनी आपल्या संघात पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना मानाचे स्थान दिले, सर्वांना समभाव शिकविला. त्यांचेच अनुयायी असे वागतात. हे सर्व पाहून माझं मन पेटून उठतं," सुस्मिताजी चीडून बोलत होत्या. रागाने त्यांच्या कपाळावरील शीर फुगली होती. चेहरा लालबुंद झाला होता.

"शांत व्हा सुस्मिताजी. तुमचे म्हणणे अगदी खरे आहे. पिढ्यान् पिढ्या अत्याचार सहन करुन त्यांची मनं मेली आहेत. निमूटपणे अन्याय सहन करण्याची त्यांच्या मनाला सवय झाली आहे. हळुहळू बदलेल हे समाजाचे चित्र. एकदम बदल अपेक्षितही नाही," महाराज समजूतीने म्हणाले.

"हळूहळू भगवान महावीरांच्या उपदेशाला पंचवीसशे वर्षे झाली तरी हा समाज आहे तसाच आहे.दलितांनी बौद्ध धर्म स्विकारू न फार दिवस झाले नाहीत, तरी त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव झाली आहे. अन्याय झाला तर पेटून उठतात ते ! संघर्ष करतात. सत्ता स्थान काबीज करण्याचा त्यांचा जोरदार प्रयत्न आहे. किती जैन लोक या सत्तेच्या स्पर्धेत उतरतात सांगा पाहू ? सत्तेत प्रवेश केल्याशिवाय काहीच मिळविता येत नाही. अल्पसंख्यांकाच्या यादीतून वगळून इतकी वर्षे झाली तरी आम्ही गप्पच आहोत. का नेत नाही आम्ही कलेक्टर कचेरीवर मोर्चे ? प्रत्येक गावतून मोर्चा जाऊ द्या . परीणाम होईल की नाही ? कां आम्ही सचिवालयासमोर उपोषणाला बसत नाही ? समाजाला प्रबोधन करणारा आमचा साधू वर्ग इतका निश्चिंत का बसला याचेच मला आश्चर्य वाटते," सुस्मिताजींचा संताप अजून ओसरला नव्हता.

"तुम्ही शांत व्हा सुस्मिताजी, तुमची तळमळ मला समजते. पण त्यागाचे व्रत तुम्ही आत्मकल्याणासाठी घेतले आहे. आपण या बंधनातून पलीकडे जाऊ शकत नाही," महाराज म्हणाले.

"असे कसे म्हणता महाराज ! आचार्य नेमीचंद्रांनी महाप्रतापी चामुंडरायांना राज्य जिंकण्यास उत्तेजन दिले ही गोष्ट खोटी आहे का ? कां त्यांनी राजकारणात लक्ष घातले ? आचार्य सोमदेवसुरींनी तर राज्य कसे करावे याचा पूर्ण आराखडाच दिला होता. त्यांनी आत्मकल्याण केले नाही कां ?" सुस्मिताजी म्हणाल्या.

"सुस्मिताजी, तो काळ वेगळा होता. पण मी तुम्हाला वेगळ्याच कारणासाठी बोलावले होते. तुमच्या गरीब वस्तीतून फिरण्याबद्दल, महिलांना शिकविण्याबद्दल येथील समाज नाराज आहे. आपल्याला येथे फार काळ राहता येईल असे वाटत नाही," महाराज म्हणाले.

"ठीक आहे, आपण दुसरीकडे जाऊया," सुस्मिताजी म्हणाल्या आणि त्यांनी महाराजांचा निरोप घेतला.

त्या गेल्यावर महाराज विचारमग्न झाले. सुस्मिता एक वेगळेच रुप त्यंना पहायला मिळाले. हा पेटता निखारा आपल्याला पेलवणार नाही याची त्यांना कल्पना आली. त्यांचे विचार, तळमळ कितीही योग्य असली तरी ती संघाला मानवणारी नव्हती. संघाची एकता टिकविणे अवघड झाले असते. पण महाराज सुस्मिताजींना संघातून काढू शकत नव्हते. त्यांचा काय गुन्हा होता ? त्यांच्या कृतीत कोणती अनैतिकता होती ? महाराज दुधारी कात्री त सापडले होते.

आपल्या कक्षात परत आल्यापासून सुस्मिताजीही सारख्या विचार करीत होत्या. महारांजाचे बोटचेपे धोरण त्यांना पसंत नव्हते. त्यांना महिलांची दयनीय स्थिती बदलायची होती. संघाच्या बंधनात, आर्यिकेच्या नेमस्त जीवनात त्यांना हे काम करता येणार नव्हते. परहित करण्याने आत्महित होत नाही हे त्यांना मान्य नव्हते. उलट दुस-याचे कल्याण केल्याने मनाला जे समाधान मिळते, तेच श्रेष्ठ आहे असा त्यांचा विचार होता. महात्मा गांधी, मदर तेरेसा यांनी दुस-यांच्या कल्याणासाठी आयुष्य समर्पित केले. त्यांच्या आत्म्याचे कल्याण झाले नाही का ? आपण या संघातून बाहेर पडायचे. आपला मार्ग शोधायचा आणि त्याच मार्गाने जायचे या बंधनात आडकायचे नाही असा त्यांनी निर्धार केला आणि मगच त्यांना शांत झोप लागली.

---------------------        -----------------------

"महाराज, मी संघाचा त्याग करण्याचे ठरविले आहे," महाराजांना नमोऽस्तु करू न जवळच बसत सुस्मिताजी म्हणाल्या.

"कां बरे ? आमच्या संघाच्या रचनेत काही दोष आहे का ?" महाराजांनी विचारले.

"नाही महाराज, दोष माझ्या स्वभावात आहे. मी आपणाबरोबर इतके दिवस राहिले. आपणही मला सांभाळून घेतले. पण केवळ आत्मकल्याण करू न समाधानी राहण्याचा माझा स्वभाव नाही. काहीतरी नवे करता येईल, समाजात, स्त्रियात जागृती करता येईल. त्यांना समतेची हक्काची जाणीव करू न देता येईल, ही माझी इच्छा सफल झाली नाही. लोक माझे, आपले प्रवचन उत्सुकतेने ऐकतात आणि विसरू न जातात. त्याप्रमाणे स्वत:त बदल करावा, आपला समाज संघटित व्हावा. असे त्यांना वाटतच नाही. नुसते व्याख्यान देऊन माझ्या मनाला समाधान नाही वाटत. प्रत्यक्ष त्यांच्यात मिसळून त्यांची सेवा करण्याची माझी इच्छा आहे. मला त्यातच आनंद आहे. मला आपण या दिक्षेतून मोकळे करा,"सुस्मिताजी म्हणाल्या.

"तुम्ही तर आत्मकल्याणासाठी हा मार्ग स्विकारला ना ?" महाराज म्हणाले.

"होय, पण त्यावेळी आत्मकल्याणातूनही दुस-याचे कल्याण करावे हाच माझा हेतू होता. पण या बंधनात राहून माझे इच्छीत साध्य होणार नाही. आपण मला या जीवनातून मुक्त करा."

महाराजांनी त्यांना अनेक प्रकारे समजाविण्याचा प्रयत्न केला, पण सुस्मिताजींचा विचार पक्का होता. महाराजांनी त्यांच्या माता-पित्यांना बोलावून घेतले. त्यांनीही आपल्या मुलीला दिक्षेतून मोकळे करण्याची विनंती केली. महाराजांना स्विकृती द्यावीच लागली.

. . . . . . . . . . .

आज मंदिरात खूप गर्दी होती. त्या गावातील झाडून सारे लोक हजर होते. स्त्रियाही बहुसंख्येने हजर होत्या. महाराज मध्यभागी पाटावर बसले होते. त्यांची पिंछी-कमंडलू समोरच होते. एका बाजूला मुनी-ब्रम्हचारी, तर दुस-या बाजूला आर्यिका आसनस्थ झाल्या होत्या. प्रत्येकाच्या अंत:करणात विचारांचा कल्लोळ माजला होता. आज महाराजांनी लोकांना का बोलावले हे गावातील लोकांना माहीत नव्हते. संघातील लोकांना थोडीशी कुणकुण होती पण खात्री नव्हती.

महाराजांनी धीर-गंभीर आवाजात 'णमो अरिहंताणं'. . . . म्हणायला सुरवात केली. मंत्र म्हणून झाल्यावर ते लोकांना उद्देशून म्हणाले- "महानुभावांनो, मी आपणास का बोलाविले याची आपणास कल्पना नसेल, आश्चर्यही वाटत असेल. आजच्या सभेचे कारण थोडे वेगळे आहे, दु:खास्पद आहे. आज आपल्या आवडत्या माताजी, सुस्मिताजी आपला संघ सोडून जाणार आहेत. त्या गृहस्थाश्रमात प्रवेश करणार आहेत. त्या या त्यागी जीवनातील कष्टमय जीवनाला

कंटाळल्या म्हणून जात नाहीत. या बंधनकारक जीवनामुळे त्यांना आपले इच्छीत ध्येय साध्य करता येत नाही म्हणून त्या जात आहेत. आम्ही त्यांना या दिक्षेच्या बंधनातून मुक्त करीत आहोत. "शुभास्ते पंथान:" असे म्हणून त्यांनी आपले भाषण संपविले.

. . . . . . . .

सुस्मिताजींनी आपली पिंछी आणि कमंडलू महाराजांच्या चरणी अर्पण करू न त्रिवार नमोऽस्तु केले. त्यांनीही पिंछीचा स्पर्श त्यांच्या मस्तकाला करू न "सध्दर्म वृध्दिरस्तु" असा आशिर्वाद दिला.

आज बंधमुक्त झालेली सुस्मिता नव्या दिशेने वाटचाल करायला निघाली होती. तिला वेशीपर्यंत पोहोचविण्यासाठी गावातील अबालवृद्ध हजर होते. गावाने या तेजस्वी, धडाडीच्या तरू णीवर प्रेम केले होते. स्त्रियांना तर आपली भगिनीच, रक्षणकर्तीच सोडून जात आहे, असे दु:ख होत होते. ती मात्र प्रसन्न होती. तिचा मार्ग तिला गवसला होता.